# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### नगरपालिका विद्यालय चांदूरबाजार (जि.अमरावती) या शाळेचे मंजूर वेतनेत्तर अनुदान मिळणेबाबत

**(१) २०४६० (०६-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपालिका विद्यालय चांदूरबाजार (जि.अमरावती) या शाळेचे मंजूर वेतनेतर अनुदान मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक १६ मार्च, २०१५ रोजी शासनास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) नगरपालिकांच्या शाळांना वेतनेत्तर अनुदान अनुज्ञेय नाही.

---

### तळप बु., (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना विविध शालेय शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(२) ३६१८१ (२१-०१-२०१६). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळप बु., (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना सुमारे दोन वर्षापासून विविध शालये शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळत नसल्याची बाब तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीत तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्ती लवकरात लवकर विद्यार्थ्यांना देण्यात यावी याबाबतची मागणी पालकवर्गाने संबंधित विभागचे गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठांकडे माहे सप्टेंबर, २०१५ वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७)** :(१) व (२) सदर शाळेतील विद्यार्थ्यांना सन २०१४-१५ पर्यंत आदिवासी शिष्यवृत्ती वाटप दि. २३/०७/२०१५ रोजी शाळा व्यवस्थापन समितीसमोर करण्यात आले होते. तसेच सफाई कामगारांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही सन २०१३-१४ पर्यंत वाटप करण्यात आली आहे. काही विद्यार्थ्यांचे बँक खाते बँकेत व्यवहार न केल्यामुळे बंद करण्यात आले होते. त्यामुळे जिल्हा समाजकल्याण अधिकारी मार्फत ऑनलाईन पद्धतीने जमा होत असलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांचे बँक खात्यात जमा झाल्या नाहीत.सदर शिष्यवृत्ती मिळण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला असून शाळा स्तरावर एकही प्रकरण प्रलंबित नाही.
(३) व (४) मुख्याध्यापकांच्या सभेमध्ये विविध शिष्यवृत्तीबाबत शाळास्तरावर एकही प्रकरण प्रलंबित राहणार नाही याबाबतची दक्षता घेण्यात यावी अशा प्रकारच्या मार्गदर्शन तथा सूचना त्या त्या शैक्षणिक सत्रामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत.

---

**पुण्यातील बालभारतीच्या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या सॅप यंत्रणेचा वापर करण्यात येत नसल्याबाबत**

**(३) ३६२९० (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील बालभारतीच्या दैनंदिन व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी पाच वर्षापूर्वी दहा कोटी रुपये खर्च करून सॅप यंत्रणा खरेदी करण्यात आली असून, अद्यापपर्यंत सदर यंत्रणेचा वापर करण्यात येत नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर यंत्रणेचा वापर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व आभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या कामकाजामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी खरेदी करण्यात आलेली सॅप यंत्रणा ही कालबाहय झाली असल्याने त्याऐवजी एक वेब पोर्टल विकसित करुन त्याद्वारे दैनंदिन कामकाज हाताळण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वलवाडी (ता.भडगाव, जि.जळगाव) या ग्रामपंचायतीने विहीर खोलीकरण, आडवे बोअर मंजुरी बाबत केलेला प्रस्ताव**

**(४) ५२९४२ (०५-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वलवाडी (ता.भडगाव, जि.जळगाव) या ग्रामपंचायतीने विहीर खोलीकरण, आडवे बोअर करण्याचा प्रस्ताव सर्व योग्य कागदपत्रासह सादर करूनही गेल्या तीन महिन्यापासून मंत्रालयात मंजुरीकरिता पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टंचाई भासल्यास, तात्काळ उपाययोजना करण्याचे शासनाने आश्वासन असूनही या ग्रामपंचायतीस प्रस्ताव मंजुरी मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रस्तावास तातडीने मंजुरी देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०४-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) वलवाडी बु. व वलवाडी खु. ता. मडगांव येथील विहीर खोलीकरणाचे प्रस्ताव रु.१.५० लक्ष पेक्षा अधिक किंमतीचे असल्याने सदरचे प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे मार्फत प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांना दि. ०४.०३.२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता देणेसाठी सादर करण्यात आले होते.

तथापि त्यावेळी पाणी टंचाई निवारणार्थ घेणात येणाऱ्या उपाययोजनां वरील आर्थिक मर्यादा वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असल्यामुळे शासन स्तरावरुन या प्रस्तावास मान्यता देण्यात आली नाही.

दरम्यान शासन निर्णय दि. ०४ मे, २०१६ अन्वये पाणी टंचाई निवारणार्थ घेण्यात येणाऱ्या उपाययोजनाबाबत आर्थिक मर्यादा वाढविण्यात आल्यानंतर विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक २३.०५.२०१६ च्या आदेशान्वये वलवाडी खु येथील विहीर खोलीकरण व आडवे बोअर करणे या उपाययोजनेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदरचे काम टंचाई कार्यक्रमातून करण्यात आले आहे.

तसेच वलवाडी बु येथील विहीर खोलीकरणाचे काम ग्रामपंचायत वलवाडी बु. यांनी १४ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीतून पुर्ण केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत:विकसित, विकसनशील व अविकसित तसेच दुर्गम भागातील नागरिकांच्या जेनेरिक औषध दुकानांची संख्या लोकसंख्येचा प्रमाणात वाढविण्याबाबत**

**(५) ५७५९२ (०५-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: विकसित, विकसनशील व अविकसित तसेच दुर्गम भागातील नागरिकांच्या लोकसंख्येचा प्रमाणात जेनेरिक औषध दुकानांची संख्या व निधी वाढविण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशी संघटना, लोकप्रतिनिधी तसेच स्थानीक रहिवाशी संघाच्या प्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.अन्न व औषध प्रशासन, मंत्री, मा.अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री, सचिव,अन्न व औषध प्रशासन विभाग, संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त तथा संबधित अन्न व औषध प्रशासने संचालनालयाचे आयुक्त तसेच संबंधित अन्न व औषध प्रशासने संचालनालय यांच्याकडे माहे २६ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०३-१०-२०१७) :**(१) हे, खरे नाही, आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांचेकडे अशा प्रकारच्या मागणीचे अर्ज प्राप्त झालेले नाहीत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विविध प्राथमिक शाळांमध्ये सन १९९५ नंतर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे खातेच उघडले नसल्याबाबत**

**(६) ६५७७४ (२७-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विविध प्राथमिक शाळांमध्ये सन १९९५ नंतर कार्यरत असलेल्या सुमारे ४००० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे खातेच उघडले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिका प्रशासन व राज्य सरकार यांतील अधिकाऱ्यांच्या असमन्वयामुळे खाते उघडले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, संस्था चालक व शिक्षक यांच्या संयुक्त नावाने खाते उघडून जवळपास ७० कोटीहून अधिक रक्कम बचत खात्यामध्ये पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागण्यासाठी संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ७४८९१ (२०-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ लाख ७ हजार शाळांमधून २ कोटी १५ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून ५० टक्के शाळा संदर्भ ग्रंथविना असल्याची बाब माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थी वर्गात वाचन संस्कृती वाढीस लागण्यासाठी शाळांना देण्यात येणारा साहित्य वाचण्यासाठीचा निधी बंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागण्यासाठी संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०९-२०१७) :**(१) व (२) नाही.
(३) शासनाकडून वेतनेतर/सादिल अनुदान यातून ग्रंथालयातील पुस्तके शाळा स्तरावर घेतली जातात. तसेच शाळांना विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त भेट रुपाने तसेच सर्व शिक्षा अभियानातून शाळांच्या ग्रंथालयांना पुस्तके प्राप्त होतात. लोकवर्गणी तसेच सामाजिक संस्था यांचेकडून ग्रंथालयास पुस्तके भेट रुपाने दिली जातात. ती सर्व ग्रंथालयात संदर्भासाठी उपलब्ध असतात. वाचनाची गोडी लागावी म्हणून विद्यार्थ्यांमध्ये त्यांची देवघेव केली जाते. तसेच शासनाकडून वाचनाची गोडी वाढावी म्हणून महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सर्व शिक्षा अभियानांतर्गत पुस्तके शाळांना उपलब्ध करुन दिली जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर नियुक्त केलेल्या शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी दिली जाणार नसल्याबाबत.**

**(८) ७५४११ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर नियुक्त केलेल्या पदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी दिली जाणार नसून त्यांना विषय शिक्षक असे संबोधले जाणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे यापूर्वी ज्या शिक्षकांना वेतनश्रेणी दिली गेली आहे त्या शिक्षकांकडून वेतनश्रेणीचा फरक वसूल करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निर्णयामुळे विषय शिक्षक हे पद शिक्षक नाकारीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) विषय शिक्षक हे पद शिक्षक नाकारीत असल्याची एकही तक्रार शासन स्तरावर प्राप्त झालेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात १ ली ते ८ पर्यंत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शाळेत मध्यान्ह भोजन, पुस्तके व गणवेश तसेच इतर दिल्या जाणा-या सोयी-सुविधा इयत्ता ८ वी नंतर बंद करण्यात येत असल्याबाबत**

**(९) ७५८७४ (२०-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १ ली ते ८ पर्यंत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शाळेत मध्यान्ह भोजन, पुस्तके व गणवेश तसेच इतर दिल्या जाणा-या सोयी-सुविधा इयत्ता ८ वी नंतर बंद करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, ८ वी नंतरच्या विद्यार्थ्यांना सोयी-सुविधा बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने ८ वी नंतरच्या विद्यार्थ्यांना उपरोक्त सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१), (२) व (३) सर्व शिक्षा अभियानांतर्गत इ.१ ली ते ८ वी पर्यंतच्या पात्र विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन, पाठयपुस्तके आणि गणवेश अशा योजना राबविण्यात येतात. तसेच, इयत्ता ९ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत खालीलप्रमाणे केंद्रपुरस्कृत विविध योजना राबविण्यात येतात.

१. ICT या योजनेंतर्गत शासकीय व अनुदानित माध्यमिक शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत.

२. गर्ल्स हॉस्टेल योजनेंतर्गत राज्यातील १० जिल्हयातील शैक्षणिकदृष्टया अप्रगत असलेल्या एकूण ४३ गटांमध्ये मुलींची वस्तीगृहे इमारत बांधकामे करण्यात येत आहेत.

३. अपंग समावेशित शिक्षण योजनेंतर्गत इ.९ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना वाचन भत्ता, वाहतुक भत्ता, मुलींकरीता विद्यावेतन, वैद्यकिय तपासणी शिबिरे घेण्यात येतात.

४. व्यवसाय शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) या योजनेंतर्गत राज्यातील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये व्यवसाय शिक्षण हा ऐच्छिक विषय सुरु करण्यात आला आहे.

५. शाळा अनुदान या योजनेंतर्गत राज्यातील एकूण १५६६ शाळांना प्रत्येकी रु.५०,०००/- वार्षिक अनुदान दिले जाते.

६. शाळा सक्षमीकरण या सदराखाली राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमिक शाळांमध्ये ३६३ अतिरिक्त वर्गखोल्या व १३४ प्रयोगशाळा इमारत बांधकामे करण्यात आलेली आहेत.

७. कला उत्सव या योजनेंतर्गत माध्यमिक व उच्च माध्ध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय कला उत्सवाचे आयोजन करण्यात येते.

८. मुलींच्या सबलीकरणाकरीता किशोरी उत्कर्ष मंच, स्वसंरक्षण प्रशिक्षण, लेक वाचवा, लेक शिकवा इ. योजना राबविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीनीबाबत**

**(१०) ७७०६७ (१२-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीनी खाजगी कंपन्यांना विकली जावू नये तसेच सदर जमिनींचा गैरवापर न व्हावा याकरिता सदर मालमत्तेमधील व्यक्तींची नावे वगळण्याचा आदेश माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने महसूल विभागाला दिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमीनी कोणाकोणाच्या नावावर आहे याबाबत सर्वेक्षण करण्याचे आदेश शासनाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात बेकायदा विक्री केल्या गेलेल्या वक्फ बोर्डाच्या किती मालमत्तेमधील नावे वगळण्यात आली आहेत तसेच शासनातर्फे याबाबत करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-१०-२०१७)** :(१) अशंत: खरे आहे. वक्फ मालमत्तांच्या ७/१२ उतारा, प्रॉपर्टी कार्ड इ.अभिलेखामध्ये भोगवटादार सदरी "संबंधित वक्फ संस्थेचे" नाव इतर हक्क सदरी "प्रतिबंधित सत्ता प्रकार" अशी नोंद घेण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत मुतवल्लींचे वा इतर कोणत्याही खाजगी इसमाची नावे अधिकार अभिलेखात नोंदविण्यात येऊ नये व अधिकार अभिलेखात आधीपासून अशी नावे अस्तित्वात असल्यास, आवश्यक कायदेशीर तरतुदींचा अवलंब करुन व संबंधितांना सुनावणीची संधी देऊन संबंधित महसुली अभिलेखात केवळ वर नमूद केल्याप्रमाणे नोंदी घेण्याविषयी महसूल व वन विभागाच्या दि.१३/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(२) होय. वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ४(६) येथील सुधारीत तरतुदींनुसार राज्यातील वक्फ मालमत्तांचे दुसरे (Second) सर्व्हेक्षण घेण्याकरिता शासन अधिसूचना दि.६.१२.२०१६ अन्वये जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख (Settlement Commissioner and Director, Land Records) यांची "सर्व्हेक्षण आयुक्त" म्हणून, सर्व जिल्हयातील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची "अतिरिक्त सर्व्हेक्षण आयुक्त" म्हणून, तसेच राज्यातील प्रत्येक जिल्हयातील सर्व तालुक्यातील तहसिलदारांची त्या त्या तालुक्याकरिता "सहायक सर्व्हेक्षण आयुक्त" म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) सर्वेक्षणाच्या पहिल्या टप्प्यात पुणे आणि परभणी येथे पथदर्शी सर्व्हेक्षण घेण्यात येणार आहे. सर्व्हेक्षणाचा पहिला टप्पा ६ महिन्यात पूर्ण करावयाचा असून सर्व राज्यातील वक्फ मालमत्तांचे सर्व्हेक्षण पूर्ण करण्यासाठी दोन वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. पहिल्या टप्प्यातील पुणे आणि परभणी येथील पथदर्शी सर्व्हेक्षणाचे काम सुरु असून ते पूर्ण झाल्यावर व राज्यातील उर्वरित भागात सर्वेक्षणाचा दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर याबाबतची आकडेवारी उपलब्ध होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील शैक्षणीक महाविद्यालयानी विद्यार्थ्यांचे कागदोपत्री बोगस प्रवेश दाखवून अनुदान प्राप्त करुन घेतल्याबाबत

**(११) ७८२३४ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील अनेक शैक्षणिक महाविद्यालयानी विद्यार्थ्यांचे कागदोपत्री बोगस प्रवेश दाखवून शासनाकडून शिष्यवृत्तीच्या नावाखाली लाखो रुपयांचे अनुदान प्राप्त करुन घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बोगस विद्यार्थ्यांचे कागदोपत्री प्रवेश दाखवून शिष्यवृत्तीसाठी लाखो रुपयाचे अनुदान प्राप्त करुन घेण्यामागे काही महत्वाच्या शैक्षणिक संस्थेचे संस्थाचालक, संचालक, प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक यांचा मोठया प्रमाणात समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अशा शैक्षणिक संस्थेच्या अधिका-यांच्या कामाची शिक्षण विभागाच्या उच्चस्तरीय विभागाकडून चौकशी करून त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१७) :**(१) नागपूर जिल्हयातील शैक्षणिक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे कागदोपत्री बोगस प्रवेश दाखवून उच्च शिक्षण विभागातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या नावाखाली लाखो रुपयांचे अनुदान प्राप्त करुन घेतल्याची बाब जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय पातळीवरील पॉवरलिफ्टींग स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेता सुरज देवकुळे या गुणी खेळाडूला आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(१२) ८०९६५ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भोईवाडयाच्या बीडीडी चाळीत राहणा-या राष्ट्रीय पातळीवर पॉवरलिफ्टींग स्पर्धेतील सुवर्ण पदक विजेता सुरज देवकुळे हा आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने हलाखीचे जीवन जगत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने या गुणी खेळाडूला प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) शहरात बाराखांबी (संकलेश्वर) मंदिर परिसरात पुरातत्व विभागाची पुर्वपरवानगी न घेता खोदकाम केल्याबाबत**

**(१३) ८१३५५ (२०-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरात बाराखांबी (संकलेश्वर) मंदिर परिसरात पुरातत्व विभागाची पुर्वपरवानगी न घेता झालेल्या खोदकामात अनेक दुर्मिळ मुर्ती काढण्यात आल्या असून उक्त मुर्तींचे प्रचंड नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुर्तींच्या संरक्षणाची कोणतीही व्यवस्था पुरातत्व विभागाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दुर्मिळ मुर्तींना संरक्षण देऊन त्या सुरक्षित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. दुर्मिळ मुर्तींचे नुकसान झालेले नाही.
(२) नाही.
(३) सदर संकलेश्वर मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्राच्या नविन शैक्षणिक धोरणाच्या अहवालाबाबत**
**राज्य शासनाने दिलेल्या सूचनाबाबत**

**(१४) ८४७२० (२०-०४-२०१७). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरविण्यासाठी टि.एस.आर. सुब्रम्हण्यम यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केंद्र शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने उक्त अहवालावर सूचना घेण्यासाठी अहवाल राज्य शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने या अहवालावर कोणत्या सूचना दिल्या तसेच त्या सूचनांवर आधारित मसुदयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) व (२) होय.
(३) प्राप्त सूचना समाविष्ट करुन अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठी आणि पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणेबाबत**

**(१५) ८४८१५ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गठीत केलेल्या तसेच 'अभिजात मराठी भाषा' समितीने तयार केलेल्या अहवालास अकादमीच्या भाषा समितीने एकमताने सकारात्मक लेखी अभिप्राय देऊन २०१५ साली तो केंद्र शासनाकडे पाठविण्यात होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच नेवासे (जि.अहमदनगर) येथे प्रस्तावित मराठी विद्यापीठ व्हावे व मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या मागणीकरिता दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास नेवासे तहसिल कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालय,मद्रास येथे प्रलंबित असलेल्या विविध रीट याचिकेवर होणाऱ्या निर्णयानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले असूनही महाराष्ट्र शासनाने मार्च, २०१७ नंतर कोणतेही प्रयत्न केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशीचे करण्यात आली आहे काय व त्यानुसार मराठी भाषे सोबत पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) मा.उच्च न्यायालयाच्या निकालानंतर प्रस्तुत प्रकरणी शासनाकडून वारंवार पाठपुरवा करण्यात आला आहे.

(५) मराठी भाषे सोबत पाली भाषेला अभिजात दर्जा देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

## विशाळगड (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) किल्ल्यावरील भूपाळ तलावाचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(१६) ८५५४९ (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विशाळगड (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) हा एक ऐतिहासिक किल्ला असून पर्यटन क्षेत्र देखील आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ल्यावर असणारा ऐतिहासिक भूपाळ तलाव गाळ व झाडाझुडपांनी भरला गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशाळगडावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या पाण्याअभावी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त किल्ल्यावरील भूपाळ तलावाचे पुनरुज्जीवन केल्यास गडवासियांसह पर्यटकांना पाणी पुरविणारा मुख्य स्त्रोत ठरेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त भूपाळ तलावाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

विशाळगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केला असून किल्ल्यातील भूपाळ तलावाच्या बाजुने काही प्रमाणात झाडे झुडपे उगवली असून गाळ साचला आहे.

(३) नाही.

(४) हे अंशत: खरे आहे.

भूपाळ तलावातील गाळ काढल्यास काही प्रमाणात गडवासिय व पर्यटकांना पाण्याचा स्त्रोत उपलब्ध होईल.

(५) होय.

गड संवर्धन योजनेअंतर्गत विशाळगड किल्ल्याच्या जतन दुरुस्ती कामाकरिता रु. ४.९५ कोटी रकमेचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून जतन कामांतर्गत तलावातील झाडे झुडपे व गाळ काढण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहे.

---

## मुंबई येथील माहीम किल्ल्याच्या दुरवस्थेबाबत

**(१७) ८५६७३ (२१-०८-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माहिमच्या किल्ल्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने किल्ला नामशेष होण्याच्या मार्गावर आहे व या किल्ल्याचा समुद्रालगतचा बुरुज कोसळण्याच्या स्थितीत असून पुरातन विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त किल्ल्याच्या सभोवताली झोपड्यांचे अतिक्रमण होत असून याकडे महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहीमच्या किल्ल्याप्रमाणे मुंबई आणि उपनगरातील अनेक ऐतिहासिक किल्ल्यांची स्थिती सध्या केवळ नाममात्र राहिली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व मुंबईतील ऐतिहासिक स्थळांचे जतन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

माहिम किल्ल्याची जमीन केंद्र शासनाच्या कस्टम विभागाच्या मालकीची आहे. समुद्रालगतच्या बुरुजाची काही प्रमाणात पडझड झाली असून झोपडयांचे अतिक्रमण झाले आहे.

(३) नाही.

मुंबईतील इतर किल्ले सुस्थितीत आहेत.

(४) माहिम किल्ला वगळता इतर किल्ल्यांची आवश्यकतेनुसार जतन-दुरुस्ती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिराच्या ( शनि मंदिराजवळील) शिळेच्या दुरुस्तीबाबत**

**(१८) ८६१५३ (२१-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिराच्या (शनि मंदिराजवळील) शिळेचा काही भाग माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा दरम्यान कोसळला असल्याची माहिती पुरातत्व विभागाला असूनही अद्याप याच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथे येणा-या भाविकांच्या मनात नेहमीच भितीचे वातावरण असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मंदिराच्या डागडुजीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याची सद्यःस्थिती काय आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय.

(२) नाही.

(३) लागू नाही. तथापि कोल्हापूरच्या अंबाबाईच्या मंदिराच्या शिळेचा काही भाग कोसळला असल्याची माहिती प्राप्त होताच सहायक संचालक, पुणे यांच्याकडून मंदिराची पाहणी करण्यात आली आहे. परंतू महालक्ष्मी मंदिर राज्य संरक्षित स्मारक नसल्यामुळे मंदिराच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शालेय अभ्यासक्रमात "सायबर सेफ्टी" हा विषय सुरु करण्याबाबत**

**(१९) ८६२६१ (२३-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंटरनेट हे सध्याच्या "डिजिटल युगांचा" अविभाज्य भाग बनल्याने शालेय विद्यर्थ्यांमध्ये इंटरनेटचा वापर झपाट्याने होत असल्याने शालेय अभ्यासक्रमात "सायबर सेफ्टी" हा विषय सुरु करावा अशी ९४ टक्के विद्यार्थ्यांची मागणी असल्याचा रिस्पॉन्सिबल नेटिझनचा सर्वेक्षण अहवाल दिनांक १३ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र टाईम्सच्या माध्यमातून मा.शिक्षण मंत्री यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे तसेच भुमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) होय.
(२) नाही.
(३) इ. १० वी च्या विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांतर्गत “Safe Internet Uses” या आशयाचा समावेश करणे प्रस्तावित आहे.

---

**नववी व दहावी वर्गासाठी असलेला गणित विषय रद्द करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२०) ८६४७८ (२३-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण विभागाने नववी व दहावी वर्गासाठी असलेला गणित विषय रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा विषय रद्द करण्यामागील कोणती कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त विषय रद्द करण्याचा निर्णय हा विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे असे तज्ज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) होय.
(२) सामान्य गणित विषय घेऊन इ. १० वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी मध्ये विज्ञान शाखेला गणित विषय घेता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते ते होऊ नये म्हणून हा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना गणवेशासाठी शासनाने २०० रुपये मंजूर केल्याबाबत**

**(२१) ८६६९२ (२३-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्व शिक्षा अभियांनातर्गत राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना गणवेश घेण्यासाठी शासनाने प्रत्येक विद्यार्थ्यांना फक्त २०० रुपये मंजूर केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या महागाईचा विचार करता २०० रुपयात कापडासह शिलाईचा खर्च भागविणे अशक्य असल्याने उक्त रक्कमेमध्ये वाढ करण्यात यावी अशी मागणी पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चिमूर (जि.चंद्रपूर) येथील पालकांनी शासनाने विद्यार्थ्यांच्या खात्यावर रक्कम न टाकता खादी ग्रामोद्योग महामंडळाकडून गणवेश पुरवावेत, अशी मागणी माहे जून, २०१७ च्या सुमारास संबधित अधिका-यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सर्व शिक्षा अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत शासकीय व स्थानिक संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील शिक्षण घेत असणाऱ्या सर्व मुली, अनूसूचित जाती व जमातीची मुले आणि दारिद्रयरेषेखालील सर्व मुले यांना प्रती गणवेश रु.२००/- याप्रमाणे २ गणवेश संचाकरीता एकूण रु.४००/- इतकी तरतूद मंजूर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दहा जिल्हयांमधील शिधावाटप दुकानांतून प्रायोगिक तत्वावर सारस्वस्त बॅंकेची सेवा देण्यात येणार असल्याबाबत**

**(२२) ८७२९२ (२१-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्याकरिता शासनाने दहा जिल्हयांमधील शिधावाटप दुकानांतून प्रायोगिक तत्वावर सारस्वस्त बॅंकेची सेवा देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकरिता कोणकोणत्या जिल्हयाची निवड करण्यात आली आहे,

(३) असल्यास, यामध्ये बॅंकेच्या कोणत्या सेवा पुरविण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीश बापट (१२-०९-२०१७) :**(१) होय.

केंद्र शासनाने दि.८ नोव्हेंबर,२०१६ च्या कार्यालयीन ज्ञापनाद्वारे राज्यातील रास्तभाव/ शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदार यांना व्यावसायिक प्रतिनिधी (Business Correspondents) म्हणून काम करण्यासाठी कार्यपध्दती विहित केली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार दि.६ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अंमलबजावणी समिती (District Level Implementation Committee) गठीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील या समितीने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर जिल्हास्तरीय समितीमध्ये जिल्ह्यातील बँकाकडून रास्तभाव दुकाने संपादित करावयाची आहेत. परंतु ज्या ठिकाणी राष्ट्रीयकृत बँकाकडून रास्तभाव दुकाने संपादित झाली नसतील अथवा काही बँका इच्छुक नसतील अशा ठिकाणी खाजगी बँका यासाठी इच्छूक असल्यास रास्तभाव दुकाने संपादित करुन राज्यातील रास्तभाव/शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरासीन दुकानदार यांना व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकासोबतच खाजगी बँकाना अनुमती देण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ निर्गमित करण्यात आलेले आहे

(२) सारस्वत बँकेला सांगली, सिंधुदुर्ग, कोल्हापूर (५०% रास्तभाव दुकान), अकोला, नागपूर (DSO), जळगांव, सोलापूर (FDO), नागपूर (FDO), रत्नागिरी, नाशिक (उर्वरित रास्तभाव दूकाने) या जिह्याचे वाटप करण्यात आले आहे.

(३) रास्तभाव दुकानांना बँकींग सेवा जसे कर्जदारांची ओळख पटवणे, लहान रकमेच्या ठेवी घेणे, कमी रक्कमेच्या ठेवी वितरीत करणे, Micro Insurance, Mutual fund, Pension product इत्यादी बँकींग सेवा पुरविणे तसेच, बँक व्यवसायाच्या अनुषंगाने इतर अनेक व्यवहार नेमण्यात आलेले व्यावसायिक प्रतिनिधी करणार आहेत.

---

## मौजे लिंगनूर व नेसरी (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) या गावातील शिधापत्रिका धारकांना अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्याची मागणी

**(२३) ८७५२२ (२१-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लिंगनूर व नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) या गावातील शिधापत्रिकाधारकांनी अन्न सुरक्षा सुरक्षेचा लाभ देण्याची मागणी तहसिलदार यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी दिनांक दिनांक ९ सप्टेंबर, २०१४ रोजी व अनेकवेळा करुनही अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व तदनुसार अन्न सुरक्षा योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१३-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन विहित केलेल्या निकषांनुसार सदर शिधापत्रिकाधारकांपैकी पात्र शिधापत्रिकाधारकांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत समावेश करण्यात आला आहे व नियमितपणे अन्नधान्याचा पुरवठा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ऐतिहासिक किल्ल्यांचे गॅझेटियर करण्याबाबत**

**(२४) ८७७६८ (२१-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हानिहाय ऐतिहासिक किल्ल्यांचे गॅझेटियर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काय नियोजन केले व त्याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत किल्ल्यांचे संवर्धन करण्याचे दृष्टीने शासन कोणकोणत्या योजना व कामे हाती घेणार आहेत,
(४) असल्यास, उक्त योजनेची अंमलबजावणी केव्हांपासून करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१७) :**(१) व (२) नाही.
दर्शनिका विगाभाच्या संपादक मंडळाने राज्य गॅझेटिअर मालिके अंतर्गत राज्यातील किल्ल्यांचे विभागनिहाय गॅझेटिअर करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात प्रथमत: कोकण विभागातील किल्ल्यांची माहिती संकलीत करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.
(३) सदर योजनेतंर्गत किल्यांचे गॅझेटिअर ग्रंथ तयार करणे अपेक्षित असून, किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम अपेक्षीत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात प्रत्येक तालुक्यात क्रिडा संकुल उभारण्याबाबत**

**(२५) ८७९३३ (२१-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात प्रत्येक तालुक्यात क्रिडा संकुल उभारण्यासाठी शासनाने रु.१ कोटी अनुदान मर्यादेतील काम करण्याचे ठरविले असून उस्मानाबाद, लोहारा, वाशी, परंडा (जि.उस्मानाबाद) आदि ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने क्रिडा संकुलाची उभारणी करण्यांत आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी जागा उपलब्घ करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली तसेच सदर क्रिडा संकुल उभारणीबाबतच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) उस्मानाबाद तालुका क्रीडा संकुलाबाबत माजी स्थानिक लोप्रतिनिधी यांनी क्रीडा संकुल येडशी येथे न करता ढोकी येथे करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार ढोकी येथील तेरणा शेतकरी सहकारी साखर कारखान्याची जागा प्राप्त करण्यासाठी प्रस्ताव साखर आयुक्त, पुणे यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

लोहारा तालुका क्रीडा संकुलासाठी ग्रामपंचायत जेवळी येथील जागा पाहणीचे काम जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद यांच्यामार्फत चालु आहे.

वाशी तालुका क्रीडा संकुलासाठी मौ.वाशी येथील श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी, जि.सोलापूर यांच्या मालकीची जागा प्राप्त झाली होती. परंतु, प्राप्त झालेल्या जागेबाबत श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी व जागा दिलेल्या शेतकऱ्यांमध्ये न्यायालयीन प्रकरण सुरु आहे.

परंडा तालुका क्रीडा संकुलासाठी सीना कोळेगाव प्रकल्प वसाहती मधील जागेची पाहणी तहसिलदार यांच्यासोबत जिल्हा क्रीडा अधिकरी, उस्मानाबाद यांनी केली असून कार्यकारी अभियंता, सीना कोळेगांव प्रकल्प, परंडा यांच्याकडून जागा उपलब्ध करुन देण्याकरिता पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मालेगांव (जि.नाशिक) शहरातील शिधापत्रिकाधारकांना शिधावाटपाचे रॉकेल व धान्य पुरवठा व्यवस्थितरित्या करण्याबाबत

**(२६) ८८१५३ (२१-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील शिधापत्रिकाधारकांना शिधावाटपाचे रॉकेल व धान्य पुरवठा संबंधित कार्यालयाकडून व्यवस्थितरित्या करण्यात येत नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी शिधावाटपाच्या धान्याचे व्यवस्थित वाटप होत नसल्याने जनतेची उपासमार होत असुन याबाबत संबधितांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार सूचित करुनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणी नियमित धान्याचे वाटप होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०१७ मध्ये मालेगाव (जि.नाशिक) शहरातील पात्र शिधापत्रिकाधारकांना नियमित केरोसिन वितरित करण्यात आले आहे.

तसेच माहे एप्रिल, २०१७ मध्ये मालेगाव (जि.नाशिक) शहरातील अंत्योदय/प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना नियमानुसार १०० टक्के अन्नधान्याचे वितरण करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

शिधावाटपाच्या धान्याचे व्यवस्थित वाटप होत नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून कोणत्याही तक्रारी प्राप्त झालेल्या नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील श्री अंबाबाई मंदिराचा राज्य संरक्षित स्मारकामध्ये समावेश करण्याबाबत**

**(२७) ८८२९२ (२१-०८-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील श्री अंबाबाई मंदिराचा राज्य संरक्षित स्मारकामध्ये समावेश करण्याबाबतचा अंतिम अहवाल पुरातत्व विभागाकडून शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिराचा राज्य संरक्षित स्मारकांत समावेश करण्याबाबत प्राथमिक अधिसुचना निर्गमित केल्यानंतर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) श्री अंबाबाई मंदिराची प्राथमिक अधिसुचना निर्गमित झाल्यानंतर सदर प्राथमिक अधिसूचनेवर मंदिर परिसरातील २३ दुकानदारांसह तीन इतर लोकांनी हरकती घेतल्या होत्या. सदर हरकतींचे निराकरण केल्यानंतर अंतिम अधिसुचनेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

परंतू त्यांनतरही प्राथमिक अधिसुचनेतील अनुसूचित मालकी या तक्त्याबाबत हरकती घेण्यात आल्या होत्या. त्याबाबत संचालनालय स्तरावर सुनावणी घेण्याच्या आदेशानुसार संचालनालयात घेतलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मालकी हक्काबाबत मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्याच्या स्तरावर भुमिअभिलेख अधिकारी, कोल्हापूर यांच्याकडील अचूक माहिती संचालनालयास उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश व्हावे असे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात असलेल्या गडकोट, पुरातन मंदिरे, लेण्या व पुरातन वास्तू यांच्या जतन आणि संवर्धनाच्या धोरणाबाबत

**(२८) ८८६६० (२१-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात असलेल्या गडकोट, पुरातन मंदिरे, लेण्या व पुरातन वास्तू यांच्या जतन आणि संवर्धनासाठी शासनाने ठोस धोरण आखलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे राज्याच्या पुरातत्व खात्याला पर्यटन, महसूल, सिंचन यांसारखा दर्जा किंवा महत्व देण्यात न आल्याने राज्यातील उक्त बाबींना वर्ल्ड हेरीटेज साईटचे नामांकन मिळू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार राज्यातील गडकोट, पुरातन मंदिरे, लेण्या व पुरातन वास्तू यांना हेरीटेज दर्जा वा नामांकन मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यावाहीचे स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) नाही, हे खरे नाही. पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुरातत्विय स्थळे व अवशेष अधिनियम १९६० च्या अन्वये राज्यातील सांस्कृतिक वारसाचे संरक्षण, जतन, संवर्धन संशोधन करते. संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या राज्य संरक्षित स्मारकांचे जतन व संवर्धन पुरातत्वीय संकेतावली व उपलब्ध असलेल्या निधीनुसार करते. किल्ले हे राज्याचे वैभव असून त्यांच्या संवर्धनासाठी शासनाने समिती गठीत केली आहे व गडसंवर्धन योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात १४ किल्ल्यांच्या दुरुस्तीवर रु. ३०,०८,९८,१३१/- इतकी रक्कम खर्च करण्यात आली असून या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील १४ किल्ल्यांच्या संवर्धनासाठी रु. ६३,१२,९०,८३२/- इतक्या रक्कमेची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या मुर्तीची होत असलेली झीज

**(२९) ८८९४५ (२१-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील श्री अंबाबाईच्या मुर्तीवर दोन वर्षापूर्वी रासायनिक संवर्धन प्रक्रिया केल्यानंतरहीची मुर्तीची झीज होऊ लागल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त मुर्तीची रासायनिक संवर्धन प्रक्रियेवेळी करवीर निवासीनी श्री अंबाबाई मुर्तीवरुन नागचिन्ह आणि शंख ही चिन्हे नष्ट झाल्याप्रकरणी राज्य शासनाने पुरातत्व विभागाला माहे एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त मुर्ती संवर्धनासाठी केलेली ही रासायनिक संवर्धनाची प्रक्रिया अपयशी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त मुर्तीची झीज होऊ नये याकरिता व प्रश्न भाग (२) बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) नाही.
(३) नाही.
(४) लागू नाही. तथापि वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने उप अधिक्षक, पुरातत्वीय रसायन तज्ञ, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, औरंगाबाद यांनी दि. २ जून, २०१७ रोजी श्री अंबाबाई मुर्तीची पहाणी केली असता मुर्तीची झीज होऊ नये म्हूणन देवस्थान व्यवस्थापन समिती, कोल्हापूर यांना उपयोजना सुचविल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात व शहरामध्ये केरोसिनचा कोटा कमी करण्यात आल्याबाबत**

**(३०) ८९१०९ (२१-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने गॅस कनेक्शन असणाऱ्या कुटुंबास केरोसिन बंद करण्याचे आदेश दिल्याने सोलापूर शहर व जिल्हयात ६ लाख २५ हजार ४१८ शिधापत्रिका असून त्यापैकी ३ लाख २० हजार ८३० जणांकडे गॅस कनेक्शन आहे, तरीही केरोसिनचा कोटा ४ लाख ८ हजार लिटरने कमी करण्यात आला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माळशिरस व सांगोला तालुक्यात केरोसिनच्या कोटयात कोणतीही कपात केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२२-०९-२०१७) :**(१) केंद्र शासनाकडून राज्यास प्राप्त होणारे केरोसिन केवळ बिगर गॅसजोडणी शिधापत्रिकाधारकांनाच अनुज्ञेय आहे. माहे ऑक्टोबर,२०१६ मध्ये सोलापूर शहरास व सोलापूर जिल्ह्यास अनुक्रमे ३९६ कि.ली व ११२८ कि.ली.केरोसिन कोटा देण्यात येत होता. तथापि, गॅसधारकांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे व दि.१३ ऑक्टोबर,२०१६ च्या शासन परिपत्रकान्वये केरोसिन पात्र बिगरगॅस जोडणी शिधापत्रिकाधारकांना केरोसिन मिळण्यासाठी दि.१ नोव्हेंबर, २०१६ पासून आधार क्रमांक सादर करणे अनिवार्य करण्यात आल्यामुळे सोलापूर शहरात ३०,९४० शिधापत्रिकाधारक व सोलापूर जिल्ह्यात १,७०,२४७ शिधापत्रिकाधारक केरोसिन मिळण्यास पात्र ठरले. यास्तव सोलापूर शहरास व सोलापूर जिल्ह्यास माहे मे,२०१७ करीता अनुक्रमे १२० कि.ली. व ६०० कि.ली. केरोसिन कोटा वितरीत करण्यात आलेला आहे.

शिधापत्रिकाधारकांनी आधार क्रमांक सादर केल्यानंतर ते केरोसिन मिळण्यास पात्र ठरत आहेत.

(२) हे खरे नाही.

दि.१३ ऑक्टोबर,२०१६ च्या शासन परिपत्रकास अनुसरून माळशिरस व सांगोला या तालुक्यांचाही केरोसिन कोटा कमी झालेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याबाबत**

**(३१) ८९१७८ (२१-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय तंत्रनिकेतन संस्था सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जून २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी येवला व त्या परिसरातील अल्पसंख्याक समाजाची लोकसंख्या, उपलब्ध शैक्षणिक सुविधा इत्यादी बाबींची पडताळणी करण्यात येत आहे.

---

**मुंबईमध्ये ३ हजार पूर्व प्राथमिक शाळा असून महापालिका किंवा शासन दरबारी यांची कुठलीच नोंद नसल्याबाबत**

**(३२) ८९३३५ (२३-०८-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये सुमारे ३ हजार पूर्व प्राथमिक शाळा असून महापालिका किंवा शासनाकडे यांची कोणतीही नोंद नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्व प्राथमिक शाळांची नोंदणीच केली जात नसल्याने शिक्षण विभागाकडे या शाळांची कोणतीही अधिकृत आकडेवारी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतरही कारवाई होत नसून पूर्व प्राथमिक शाळांसाठी कायदा, नियमावली अस्तित्वातच नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने पूर्व प्राथमिक शाळांसाठी कायदा व नियमावली बनविण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय.

(४) पूर्व प्राथमिक शैक्षणिक धोरणविषयक अधिनियम तयार करण्याचे शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील केंम्ब्रीज शाळेने शिक्षण हक्क कायदयाचे उल्लंघन केल्याबाबत**

**(३३) ८९८८४ (२३-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील इंग्रजी माध्यमाच्या केंब्रिज शाळेमध्ये शिक्षण हक्क प्रवेश प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रवेश प्रक्रियेबाबत पालकांना माहिती नसतांनाही त्यांच्या पाल्यांचे नाव शिक्षण हक्कच्या यादीत टाकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, शिक्षण हक्क कायदयाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबधित शाळेच्या प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्याची, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) शिक्षण हक्क कायदयाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संस्थेने मुख्याध्यापकांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांना निलंबित केले आहे. सदर शाळेचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याकामी शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या मोफत गणवेश योजनेची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत**

**(३४) ९१०६० (२३-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत २०१७-१८ मध्ये मोफत गणवेश योजनेच्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक बचत खात्यात जमा करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला असून गणवेश वाटपात होणारा विलंब आनियामितता आदि प्रकारास आळा घालण्यासाठी गणवेशाचा निधी थेट आई व विद्यार्थी यांच्या संयुक्त खात्यात जमा होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच श्रीगोंदा तालुक्यात (जि.अहमदनगर) पहिली ते दहावीत शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती, अपघात विमा योजना, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, मोफत गणवेश योजना राबविल्या जात असून शासनाकडून विद्यार्थ्यांना बँकेत खाते उघडून योजनेच्या लाभाची रक्कम थेट बँक खात्यात जमा करण्याचे शिक्षण विभागाला आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याकरिता बँकेत विनाशुल्क खाते उघडण्याकरिता विद्यार्थ्यांच्या आईकडे पॅनकार्ड नसल्याने अडचणी येत असल्याचे तसेच जिल्ह्यातील सर्व बँका विद्यार्थ्यांचे झिरो बॅलन्सवर खाते उघडण्यासाठी आणि सुरू ठेवण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजना निधी उपलब्द करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत गणवेश योजनेचा निधी शाळास्तरावर वितरीत करण्यात आला असून पात्र विद्यार्थ्यांनी गणवेश खरेदी केल्याची पावती दाखवून अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण येथील भंडारी शिक्षण संस्थेच्या हायस्कूल मधील शिक्षिकेचे वेतन गत १० महिन्यापासून थकित असल्याबाबत**

**(३५) ९१२६१ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) येथील भंडारी शिक्षण संस्थेच्या प्रशाळेत १९८९ पासून कायमस्वरूपी शिक्षिका म्हणून काम करित असताना दिनांक १ ऑगस्ट २०१६ पासून माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी अधिकाराचा दुरूपयोग करून वेतन थांबविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणतेही कारण नसताना वेतन थांबविल्यामुळे सदरहू महिला शिक्षिका आर्थिक कोंडीत सापडल्याने मासिक वेतन विनाविलंब मिळावेत यासाठी गत ६ महिन्यापासून सातत्याने शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग, सिंधुदुर्ग, मा.शिक्षणमंत्री, मा.पालकमंत्री, मा.मुख्यमंत्री आदीकडे निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त महिला शिक्षिकेने रोखलेला पगार न मिळाल्यामुळे दिनांक ३ जुलै २०१७ पासून शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला असून त्याबाबतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, आदीकडे दिनांक २० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू शिक्षिकेस विनाविलंब गत १० महिन्यांपासूनच्या थकबाकीसह नियमित वेतन मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली तसेच अधिकाराचा दुरूपयोग करून वेतन रोखणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :** (१) , (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) या प्रकरणी संस्थेकडून कोणतेही सहकार्य मिळत नसल्यामुळे शिक्षणाधिकारी स्तरावरुन श्रीमती टिकम व श्री. पाटील यांचे जुलै, २०१७ चे वेतन अदा करण्यात आले असून मागिल थकबाकीचे वेतन बिल सादर करण्यासाठी संबंधीत मुख्याध्यापकास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयात जलस्वराज्य २ प्रकल्पांतर्गत टंचाईग्रस्त गावातील कामे सुरु करण्याबाबत**

**(३६) ९१७२२ (२१-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयात जलस्वराज्य २ प्रकल्पांतर्गत टंचाईग्रस्त गावात साठवण टाक्या बांधण्यासाठी भोर तालुक्यातील ३ गावांसाठी ८० लाख ८६ हजार २०६ रुपये मंजूर झाले असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे जिल्हयातील २० गावांसाठी ५ कोटी ५ लाख ४७ हजार ३८१ रुपये मंजूर झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर कामांना सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०९-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक १४ मार्च, २०१४ व दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या टंचाईग्रस्त गावे / वाडयासाठी पाऊस पाणी साठवण व्यवस्था निर्माण करणेसाठी कार्यवाही करणेत येत आहे. दि.२६ एप्रिल, २०१७ व दि. १४ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये या उपक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या उपाय योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

जलस्वराज्य २ कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्हयातील ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या २० टंचाईग्रस्त गावे/वाडयांसाठी एकूण अंदाजित रू. ४,९३,९७,३०६/- इतक्या खर्चाच्या उपाय योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये भोर तालुक्यातील ३ गावे/वाड्या/वस्त्यांमधील रू. ८०,८६,२०६/- इतक्या अंदाजित खर्चाच्या उपाययोजनांचा समावेश आहे.

(३) सदर कामांकरिता शासन स्तरावरुन ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली असून संबंधित कंत्राटदारास दि. १५ जून, २०१७ रोजी कार्यारंभ आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्हयातील प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांना गणवेशाचे पैसे मिळाले नसल्याबाबत

**(३७) ९१९३० (२३-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांना शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास गणवेशाचे पैसे मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेशाचे पैसे विद्यार्थ्यांना देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना गणवेशाचे पैसे देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) दि.०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये गणवेश योजनेसह इतर अनेक योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतरण रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक

खात्यात करण्याबाबत निर्णय घेतला आहे. यानुषंगाने सन २०१७-१८ मध्ये सदर योजनेचे प्रती लाभार्थी २ गणवेश संचासाठी प्रत्येकी रु.४००/- इतकी रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांची बँक खाती उघडण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच, सदर योजनेचा निधी शाळास्तरावर वितरीत करण्यात आला असून पात्र विद्यार्थ्यांनी गणवेश खरेदी केल्याची पावती दाखवून अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भडगांव (जि.जळगांव) येथील क्रिडा संकुल वॉल कंपाऊंड बांधण्याकरिता**
**विशेष बाब म्हणून निधी मिळणेबाबत**

**(३८) ९१९८७ (२१-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभडगांव (जि.जळगांव) येथील क्रीडा संकुलास वॉल कंपाऊंड बांधण्याकरिता विशेष बाब म्हणून निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. शालेय शिक्षण मंत्री, यांना दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार निधी उपलब्ध करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, जळगांव जिल्ह्यात एकूण किती व कोणकोणत्या तालुक्यात क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरु आहे तसेच क्रिडा संकुलासाठी किती रक्कमेची तरतूद केली आहे व त्यावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जळगांव जिल्हयात एकूण १५ तालुके असून ९ तालुक्यात क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरु आहे. सदर तालुक्यातील क्रीडा संकुलाची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | वितरीत तरतूद (लक्ष) | बांधकामावरील खर्च (लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | अमळनेर | १००.०० | ९५.०० |
| २ | भडगांव | १००.०० | ९०.०० |
| ३ | धरणगांव | १००.०० | ९५.०० |
| ४ | एरंडोल | १००.०० | ९५.०० |
| ५ | मुक्ताईनगर | १००.०० | ९५.०० |
| ६ | पारोळा | १००.०० | ९५.०० |
| ७ | चाळीसगांव | १००.०० | ९५.०० |
| ८ | भुसावळ | १००.०० | ९५.०० |
| ९ | रावेर | १००.०० | ९५.०० |

| | | |
|---|---|---|
| १० | चोपडा | प्रस्ताव नव्याने प्रशासकीय मान्यतेसाठी क्रीडा संचालनालयास प्राप्त झाला आहे. |
| ११ | पाचोरा | प्रशासकीय मान्यता दिली आहे. तथापि, जागेबाबत वाद निर्माण झालेला आहे. |
| १२ | यावल | जागा प्राप्त अंदाजपत्रक व आराखडे बनविण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| १३ | बोदवड | जागेबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु आहे. |
| १४ | जळगांव | जागा अप्राप्त |
| १५ | जामनेर | जागा अप्राप्त |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाकरिता केअर टेकर पॉलिसी हाती घेऊन त्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत

**(३९) ९२१३८ (२१-०८-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाकरिता केअर टेकर पॉलिसी प्राधान्यक्रमाने हाती घेऊन त्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे झालेल्या राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत ठरविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केअर टेकर पॉलिसीनुसार चोपडा (जि.जळगांव) या तालुका क्रिडा संकुलाबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) राज्य क्रीडा विकास समितीच्या दिनांक १०.०३.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांच्या निर्देशानुसार राज्यातील विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलातील क्रीडा सुविधा, त्यांचा क्रीडा उपयोग / वापराकरिता सद्यस्थितीतील बाजारभावाचे मुल्यांकन (Market Value), उत्पादनाचे स्त्रोत, खेळ विषयक पोषक वातावरण व कल इ. गोष्टींचा तांत्रिक व शास्त्रोशुध्द अभ्यास होणेकरिता बाहय एजन्सीची नियुक्ती करावयाचे ठरले. त्यानुसार वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन क्रीडा विषयक काम करणाऱ्या क्रीडा संस्था, कंपनी, क्रीडा प्रेमी इत्यादीकडून Care Taker & Sports Mapping बाबत तंत्रशुध्द व अभ्यासपूर्ण मसुदा किंवा धोरण तयार करणेकरिता Expression of Interest (अभिव्यक्ती सूचना) घेऊन त्यानुसार वृत्तपत्रामध्ये जाहिरात दिली असता एकूण ९ क्रीडा संस्थांनी यामध्ये सहभाग नोंदविला आहे. त्यांच्याकडून Care Taker & Sports Mapping बाबत सादरीकरण (PPT) करण्यात आले असून याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड तालुक्यातील (जि.ठाणे) प्राथमिक शाळेतील शिक्षकांना दोन महिन्यांचे वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(४०) ९२२७५ (२३-०८-२०१७). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड तालुक्यातील (जि.ठाणे) प्राथमिक शाळेतील शिक्षकांना माहे फेब्रुवारी व मार्च, २०१७ या दोन महिन्याचे वेतन मिळाले नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शिक्षकांचे वेतन तातडीने देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०१७ चे वेतन वेळेवर अदा करण्यात आले असून मार्च, २०१७ चे वेतन विलंबाने अदा करण्यात आले आहे. सन २०१७-१८ ची वित्तीय तरतूद उपलब्ध झाल्यानंतर मार्च, २०१७ चे वेतन अदा करण्यात येत असल्यामुळे त्यास विलंब झालेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शहीद हेंमत जोशी क्रिडांगणाच्या विकास करण्याबाबत**

**(४१) ९२४२० (२१-०८-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) शहरातील महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियमचे उद्घाटन झाले तर शासकीय क्रीडा संकुलाचे हस्तांतरण प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खेळांडूना खेळाचे मैदान कमी पडत असल्यामुळे चाळीसगाव शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शहीद हेंमत जोशी क्रिडांगणाचा विकास करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत**

**(४२) ९२७०८ (२१-०८-२०१७). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथे तालुका क्रीडा संकुल निर्माण करण्यासबंधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्ताव प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) बिलोली तालुका क्रीडा संकुलकरिता नगरपालिका, बिलोली यांच्यात सामंजस्य कराराद्वारे गट क्र.१५३ मधील २ हेक्टर २२ आर जागा प्राप्त झालेली असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर यांनी रु.१००.०० लक्षाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करुन जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांच्यामार्फत क्रीडा संचालनालयास दिनांक ०३.०८.२०१७ रोजी सादर केले आहेत. सदर अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी आगामी राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत सादर करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पन्हाळगड (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याबाबत**

**(४३) ९२८९३ (२१-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळगड (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) एक ऐतिहासिक व पर्यटन केंद्र असून दरवर्षी लाखो पर्यटक इथे भेट देत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त किल्ल्याची पडझड होण्यास सुरुवात झाली असून तीन दरवाजाचे दगड निखळू लागले असून गडावरील लोखंडी दरवाजा बसवण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त किल्ल्याचे जतन व संवर्धन करण्याकरिता कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे. पन्हाळगड किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडळ कार्यालय, मुंबई यांच्या अखत्यारित येतो. अधिक्षक पुरातत्वविभाग यांनी कळविल्यानुसार, पन्हाळगड किल्ल्यातील तीन दरवाजाच्या जुन्या संरचनेमुळे तसेच हवातान स्थितीमुळे पावसाळी हंगामात दरवाजाचे दगड निखळत असतात. पन्हाळगडावर तीन दरवाजा बसविण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याबाबतची कुठलीही माहिती उपलब्ध नाही .तसेच पन्हाळगड किल्ल्याच्या जतन दुरुस्तीची कामे मान्यता मिळालेल्या अंदाजपत्रकानुसार व प्राप्त झालेल्या निधीतून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडल, सायन या कार्यालयाव्दारे वेळोवेळी केली जातात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्थलांतर करणारी ६ ते १४ या वयोगटांतील २ कोटींपेक्षा जास्त मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली नसल्याबाबत

**(४४) ९२९८८ (२३-०८-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक परिस्थीमुळे वेगवेगळ्या कारणांनी स्थलांतर करणारी ६ ते १४ या वयोगटांतील २ कोटींपेक्षा जास्त मुले अजूनही शिक्षणाच्या प्रवाहात येऊ शकत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पटनोंदणी पंधरवडा मोहिमेत स्थलांतरित मुलांची नावे शाळेत दाखल होऊन देखील त्यांची शाळेतील नियमित उपस्थिती टिकवण्याचे कर्तव्य शाळा पार पाडू शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालाघाट, मेळघाट, डोंगरी भाग आणि आदिवासी पाड्यांवर अजूनही वस्तीपासून १० किलोमीटर पर्यंत उच्च प्राथमिक शाळा नसून शाळांना पुरेशा आणि सुविधायुक्त इमारती तसेच ग्रामीण आणि दुर्गम भागातील ९० टक्के शाळांमध्ये वीज आणि पिण्याचे पाणी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांना शाळा प्रवाहात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१७) :**(१), (२) व (३) नाही.

(४) "बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, २००९ नुसार स्थलांतर करणारी बालके याचा अर्थ शाळेत नाव नोंदविलेले असेल, त्या शाळेच्या ठिकाणापासून नव्या ठिकाणी एका शैक्षणिक सत्रापेक्षा कमी कालावधीत त्यांच्या पालकांसोबत किंवा अन्यथा स्थलांतर करणारी बालके असा करण्यात आला आहे. राज्यामध्ये प्रामुख्याने ऑक्टोबर ते मार्च या कालावधीमध्ये ऊसतोडणी, वीटभट्टी, रस्ते बांधणी, कृषी उद्योग, बांधकामे, दगडांच्या खाणी,

शेती अशा निरनिराळया क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातच जिल्हयांतून किंवा इतर जिल्हयांतून मोठया प्रमाणावर स्थलांतरीत कामगार रोजगारासाठी जातात.

सर्व शिक्षा अभियानातंर्गत स्थलांतरित होणा-या कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृह योजना प्रति वर्षी माहे ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत राबविण्यात येते. सदर स्थलांतरित होणा-या कामगारांच्या मुलांची माहिती प्रति वर्षी वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रकात सादर करण्यात येते. त्याअनुषंगाने भारत सरकारकडून हंगामी वसतिगृहे योजनेस मान्यता देण्यात येते. सदरची योजना ही स्थलांतरित होणा-या कामगारांच्या मुलांना मूळ ठिकाणी थांबविण्यासाठी मंजूर असून त्याअनुषंगाने सन २०१६-१७ मध्ये ७९,४५७ विद्यार्थ्यापैकी ६७,३७३ इतक्या विद्यार्थ्यांना स्थलांतरित होण्यापासून रोखलेले आहे. म्हणजेच सदर मुलांचे शिक्षण त्यांच्या मूळ जागी नियमित शाळेत होत असून, जवळपास ८५% मुलांना रोखण्यात यश आलेले आहे. जी मुले स्थलांतरापासून रोखता आलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी शासन परिपत्रक दि. ०१/१०/२०१५ अन्वये शिक्षण हमी पत्रक देण्याची तजवीज करण्यात आलेली आहे. स्थलांतरण रोखण्यासाठी सर्व शिक्षा अभियानातंर्गत निवासी हंगामी वसतिगृह योजनेअंतर्गत भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अशा मुलांची माहिती संगणक प्रणालीव्दारे संबंधित जिल्हयांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे."

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील सावनेर क्रीडा संकूलाच्या विकासाकरीता निधी मिळण्याबाबत**

**(४५) ९३१५४ (२१-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) क्रीडा संकुलनाचा विकास तसेच विविध कामे करण्याकरीता ५ कोटी ६७ लक्ष रूपयांचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून मंजूरी करीता शासनास सादर करण्यात आले असता या प्रस्तावास मंजूरी मिळालेली नसल्याची बाब दिनाक २२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यतेसह निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सावनेर तालुका क्रीडा संकुलाचे रु.५,६७,००,७६८/- चे सुधारित अंदाजपत्रक व आराखडे जिल्हा क्रीडा अधिकारी, नागपूर यांनी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ च्या तांत्रिक मान्यतेसह क्रीडा संचालनालयास सादर केले असून शासन अनुदान मर्यादा रु.१००.०० लक्ष पेक्षा

अधिक होणाऱ्या खर्चासाठी अतिरिक्त तरतूद समिती स्वबळावर उभारेल अशी संबंधित समितीने हमी दिल्यास सदर अंदाजपत्रक व आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी आगामी राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीमध्ये विचार करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद-जालना शिरसवाडी येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सुरु करण्याबाबत**

**(४६) ९३७१९ (२१-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-जालना शिरसवाडी येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय ख्यातीचे इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) सुरु करण्यासाठी शिरसवाडी गावातील २०३ एकर जमिनींचे हस्तांतरण माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान तंत्रशिक्षण विभागाकडे केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आयसीटीसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त आयसीटी बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०९-२०१७) :**(१) मौ.सिरसवाडी, ता.जि.जालना येथील गट नं १३२ मधील २०० एकर शासकीय जमिन इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी या संस्थेस महसूल व वन विभागाच्या दिनांक १७/१०/२०१६ च्या शासन ज्ञापनानुसार उपलब्ध करुन देण्यात आली आहे. शासनाच्या दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या ज्ञापनास अनुसरुन जिल्हाधिकारी जालना यांचे आदेश क्रमांक २०१७/म.शा.का./जमीन/सी.आर.-२०६, दिनांक ३०/०१/२०१७ अन्वये जमीन संस्थेस सुपूर्त करण्यात आली आहे.
(२) इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या प्रस्तुत प्रकल्पाकरीता निधीची अद्याप तरतुद करण्यात आलेली नाही.
(३) इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या प्रस्तुत प्रकल्पाच्या बांधकामाची कार्यवाही संस्था करणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**मुंबई येथील रंगभवन हे खुले रंगमंच बंद असल्याबाबत**

**(४७) ९४२०३ (२१-०८-२०१७). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील मेट्रो स्थित रंगभवन हे खुले रंगमंच गत कित्येक वर्षापासून बंद असल्याची बाब माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रंगमंच बंद असल्यामुळे शासनाच्या महसुलात घट होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रंगमंचाची तात्काळ दुरुस्ती व नुतनीकरण किंवा बंदिस्त नाट्यगृह बांधण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व विचाराधीन प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०९-२०१७) :**(१) होय.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.२५.९.२००३ च्या न्यायनिर्णयानुसार रंगभवन व आजूबाजूचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.त्यामुळे रंगभवन व तेथील कार्यक्रमांवर पूर्णत: बंदी आलेली आहे.

(२) होय.

(३) व (४) सद्यस्थितीमध्ये रंगभवन व आजूबाजूचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित केल्यामुळे सदर वास्तूचा वापर करणे शक्य नाही. या वास्तूचा खुले नाट्यगृह म्हणूनच वापर होणे आवश्यक आहे. यासाठी सदर प्रकरणी निश्चित काय कार्यवाही करता येऊ शकेल याबाबतचे अभिप्राय पर्यावरण विभागाकडून प्राप्त करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्पातील दोषी अधिकारी व तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्यावर कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई**

**(४८) ९४३७८ (२१-०८-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदरूख (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) जलस्वराज्य प्रकल्पातील दोषी तांत्रिक सेवा पुरवठादाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग देवगड यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सिंधुदुर्ग यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ रोजी फेर आदेश दिलेले असतानाही तसेच तत्पूर्वी माहे एप्रिल २०१६ पासून शासनस्तरावरून कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.विभाग, जि.प., सिंधुदुर्ग यांना वारंवार याबाबत

निर्देश दिलेले असतानाही आजमितीपर्यंत सदर प्रकल्पातील तांत्रिक सेवा पुरवठादारावर गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याची बाब माहे जुलै २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जलस्वराज्य प्रकल्पातील तत्कालीन अधिकाऱ्यांकडून मागविण्यात आलेले खुलासे जि.प., सिंधुदुर्ग यांच्याकडे प्राप्त होवून वर्षभराहून अधिक कालावधी लोटला असतानाही तसेच मा.पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी सदर प्रकल्पातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे जाहीर आश्वासन दिलेले असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सिंधुदुर्ग यांच्याकडून सदरहू जलस्वराज्य प्रकल्पातील तत्कालीन दोषी अधिकाऱ्यांवर आजतागायत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरहु प्रकल्पातील तांत्रिक सेवा पुरवठादार व तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सिंधुदुर्ग यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी चालविलेल्या अक्षम्य दिरंगाईची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणी हेतुपुरस्सर दिरंगाई करणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि, आणि उप अभियंता, उप विभाग देवगड यांच्यावर शासनाने आजतागायत कोणती कारवाई केली वा करण्यातयेत आहे

(५) असल्यास, सदरहु जलस्वराज्य प्रकल्पातील तांत्रिक सेवा पुरवठादार आणि तत्कालीन अधिकारी यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(६) नसल्यास, सदर प्रकरणी दोषी तांत्रिक सेवा पुरवठादार आणि तत्कालीन अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ च्या पत्रान्वये तांत्रिक सेवा पुरवठादारावर गुन्हा दाखल करण्याबाबत दिलेल्या फेरआदेशांनुसार उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, देवगड यांनी सदर प्रकल्पातील तांत्रिक सेवा पुरवठादारावर गुन्हा दाखल करण्यासाठी दिनांक २९ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये पोलीस निरीक्षक, पोलिस स्टेशन, मालवण यांना विनंती केली. त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी दिनांक ३१ मार्च, २०१७ च्या पत्रान्वये पोलिस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांना तांत्रिक सेवा पुरवठादाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस निरीक्षक, मालवण यांना त्यांच्या स्तरावरुन सुचना देण्याची विनंती केली.

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी या प्रकरणी चौकशीमध्ये तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर कार्यवाही करणे इतपत पुरावा उपलब्ध झालेला नसल्याचे त्याचप्रमाणे तांत्रिक सेवा पुरवठादाराचा या प्रकरणी गुन्हयामध्ये सहभाग दिसून आल्यास त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी जलस्वराज्य प्रकल्पातील तत्कालीन संबंधित २१ अधिकारी / कर्मचारी यांचेकडून जिल्हा परिषदेने खुलासे मागविण्यात आलेले होते. त्यापैकी ८ अधिकारी / कर्मचारी यांचे खुलासे अमान्य करण्यात आले. ८ अधिकारी / कर्मचाऱ्यांपैकी सद्यस्थितीत जिल्हा परिषदेकडे कार्यरत असलेले २ अधिकारी / कर्मचारी यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे. १ अधिकारी सेवानिवृत्त झालेले असून ५ अधिकारी / कर्मचारी सद्यस्थितीत अन्य खात्यांकडे कार्यरत असल्याने त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून संबंधित खात्यांस सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी या प्रकरणी चौकशीमध्ये तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेवर कार्यवाही करणे इतपत पुरावा उपलब्ध झालेला नसल्याचे त्याचप्रमाणे तांत्रिक सेवा पुरवठादाराचा या प्रकरणी गुन्हयामध्ये सहभाग दिसून आल्यास त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांना दिनांक १९ सप्टेंबर २०१७ च्या पत्रान्वये कळविलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्र शासनाने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ सर्व शासकीय/निमशासकीय व खाजगी संस्था व महामंडळांना देण्याबाबत**

**(४९) ९४५१३ (२१-०८-२०१७). अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ सर्व शासकीय /निमशासकीय व खाजगी संस्था व महामंडळांना देण्याबाबतची मोहिम दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३० जून, २०१७ या कालावधीत राबविली असून त्यानुषंगाने माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळातील सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांची नांव नोंदणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाचे सदर निर्णयाप्रमाणे ज्या कर्मचाऱ्याचे वेतन दिनांक १ जून, २००९ ते ३१ ऑगस्ट, २०१४ पर्यंत रु.६५००/- पर्यंत आहे तसेच दिनांक १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत ज्या कर्मचाऱ्याचे वेतन रु.१५०००/- पेक्षा कमी आहे अशा कर्मचाऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात यावा, असे ठरले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नांवाची उक्त कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योजने अंतर्गत नोंदणी करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्नोक्त भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०९-२०१७) :**(१) होय.
(२) होय.
(३) व (४) आयुक्त भविष्य निर्वाह निधी, विभागीय कार्यालय बांद्रा, मुंबई यांचेकडे महामंडळाची नियोक्ता (Employer) म्हणून नोंदणी करण्यात आली आहे व केंद्र शासनाच्या Employees Enrolment Campaign २०१७ योजने नुसार कंत्राटी कर्मचा-यांना लाभ देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील शासकीय गोदामातील शिधापत्रिकेवर वाटपासाठी ठेवण्यात आलेल्या धान्याचा झालेला अपहार**

**(५०) ९४८७४ (२१-०८-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला (जि.अकोला) येथील शासकीय गोदामातील शिधापत्रिकेवर वाटपासाठी ठेवण्यात आलेल्या २०० क्विंटल धान्याचा अपहार तहसील अकोट यांनी दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास टाकलेल्या छाप्यामध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोट येथी शासकीय गोदामातील शेकडो क्विंटल धान्याचा अपहार मागील तीन वर्षात तीन वेळा निदर्शनास आला असून त्यासंदर्भात संबंधितांकडून रक्कम वसूल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. गिरीश बापट (२१-०९-२०१७) :**(१) तहसिलदार, अकोट यांनी दिनांक १५/७/२०१७ रोजी अकोट, जिल्हा अकोला येथील शासकीय धान्य गोदामाची तपासणी केली असता धान्यसाठयामध्ये गहू १३६.५० क्विंटल व तांदूळ ४३ क्विंटल कमी असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२), (३) व (४) अकोट येथील शासकीय गोदामात मागील तीन वर्षात अन्न धान्याचा अपहार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

सन २०१५ मध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दि.१४.०५.२०१५ रोजी अकोट जिल्हा अकोला येथील शासकीय धान्य गोदामाची पाहणी केली असता प्रत्यक्ष मोजणीत गहु १७३.९२ क्विंटल व तांदूळ ३०.६१ क्विंटल कमी आढळल्यामुळे श्री.वाय.आर. जांभोरकर, गोदाम व्यवस्थापक, अकोट यांना जिल्हाधिकारी अकोला यांच्या दि.२७.०७.२०१५ च्या आदेशान्वये निलंबित करुन त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या दि.१०.०७.२०१५ च्या आदेशान्वये श्री.जांभोरकर यांच्याकडून कमी

आढळलेल्या धान्याचे प्रचलित दराने एकूण रु.४,३८,०२०/- वसुल करण्याबाबत आदेश पारित केले आहेत. श्री.जांभोरकर यांनी रु.१,००,०००/- चलनाद्वारे भरणा केलेले असून त्यांच्या माहे ऑक्टोंबर २०१६ च्या मासिक वेतनापासून उर्वरित रकमेची प्रति दरमहा रु.५०००/-प्रमाणे वसुली करण्यात येत आहे.

सन २०१६ मध्ये उपजिल्हाधिकारी (महसुल) अकोला यांनी दि.०५.०१.२०१६ ते दि.१४.०१.२०१६ या कालावधीत अकोट गोदामाच्या केलेल्या तपासणीत गोदामात गहु ३४६.६८ क्विंटल, तांदुळ ३०७.६९ क्विंटल व साखर ३५.७५ क्विंटल जास्त साठा असल्याचे आढळून आले आहे. जिल्हाधिकारी, अकोला यांच्या दि.०८.०३.२०१६ च्या आदेशान्वये श्री.सुधीर थेटे,गोदाम व्यवस्थापक,अकोट यांना निलंबित करण्यात आले आहे.तसेच जिल्हाधिकारी, अकोला यांच्या दि.०४.०८.२०१६ च्या आदेशान्वये श्री.थेटे यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

सन २०१७ मध्ये तहसिलदार अकोट यांनी दि.१५.०७.२०१७ रोजी शासकीय धान्य गोदाम, अकोट येथील तपासणी केली असता गोदामात १३६.५० क्विंटल गहु व ४३ क्विंटल तांदुळ साठा कमी असल्याचे आढळून आले आहे. याबाबत श्री.एम.एस.मेश्राम, गोदामपाल शासकीय धान्य गोदाम, अकोट यांना जिल्हाधिकारी अकोला यांच्या दिनांक १७.७.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.